सन २०२६ मधील दुष्काळजन्य स्थितीत चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी मंत्रीमंडळाच्या उपसमितीने नियुक्त केलेल्या अभ्यासगटाच्या शिफारसींची अमंलबजावणी करण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : DAHD-१४०३४/५४/२०२६-DAHD-AH४ (E-१८६९५२८)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ३० ऑक्टोबर, २०२६

संदर्भ :-
१) मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २०२६/ प्र.क्र. ८२/ म-२, दि. २५/०९/२०२६
२) मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २०२६/ प्र.क्र. ८२/ म-२, दि. १४/१०/२०२६
३) दि. २९/०९/२०२६ व दि. १४/१०/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४) शासन निर्णय क्रमांक- DAHD- १४०३४/५४/२०२६-AH४ (E- १८६९५२८), दि. ०६/१०/२०२६
५) दि.२७/१०/ २०२६ या अभ्यास गट समितीचा अहवाल
६) दि. २७/१०/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक.

शासन निर्णय :-

एल-निनोच्या प्रभावामुळे यावर्षी पर्जन्यमानात मोठया प्रमाणात घट झाली आहे. या पार्श्वभुमीवर मदत व पुनर्वसन विभागाने उपरोक्त वाचा क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या अनुक्रमे २६५ व ३९ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेवून उपाययोजना सुचविण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली वाचा क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक दिनांक २९/०९/२०२६ रोजी पार पडली. सदर बैठकीत दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार वाचा क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.

मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाच्या दि. १२.१०.२०२६, दि.१५.१०.२०२६ व दि. २१.१०.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेस अनुसरुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल दि. २७.१०.२०२६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत स्विकारण्यात आला आहे. सदर अहवालानुसार संबंधित विभागांनी करावयाच्या कार्यवाहीचा तपशिल परिशिष्ट “अ” प्रमाणे व विभागनिहाय चेकलिस्ट परिशिष्ट “ब” प्रमाणे आहे. सर्व संबंधित विभागांनी त्यांच्याशी संबंधित शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६१०३०१०३६०७६७४५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.10.30 10:36:55 +05'30'

(नि.भा. मराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
५. अपर मुख्य सचिव (महसूल)
६. अपर मुख्य सचिव (वित्त)
७. अपर मुख्य सचिव (नियोजन)
८. अपर मुख्य सचिव (उर्जा)
९. अपर मुख्य सचिव (वने)
१०. प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन)
११. प्रधान सचिव (सहकार)
१२. प्रधान सचिव (मृद व जलसंधारण)
१३. प्रधान सचिव (जलसंपदा)
१४. सचिव (कृषि)
१५. सचिव (ग्राम विकास)
१६. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. सर्व विभागीय आयुक्त
१९. सर्व जिल्हाधिकारी
२०. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
२१. सर्व कुलसचिव, कृषि विद्यापीठे.
२२. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महारष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे.
२३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महारष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर.
२४. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त.
२५. महालेखापाल कार्यालय १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), मुंबई / नागपूर.
२६. मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२७. अवर सचिव (पदुम-१६), कक्ष अधिकारी (पदुम-१, २ व ३), पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८. निवड नस्ती पदुम-४.

परिशिष्ट "अ"

अभ्यास गटाच्या शिफारशी व संबधित विभाग

क्र	शिफारसी	संबधित विभाग
१	**चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन व मुल्यवर्धन**	
	१. मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चा-याचे संवर्धन व मुल्यवर्धन आणि पर्यायी स्रोत या बाबतच्या योजना राबविण्यास किमान ५% निधी पालकमंत्र्यांच्या मान्येतेने सर्व जिल्हाधिकाऱ्यानी त्वरित उपलब्ध करुन द्यावा.	नियोजन विभाग व जिल्हाधिकारी
	२. रब्बी हंगामात चारा बियाण्याची कमतरता भासणार नाही, यासाठी कृषि विभागाने महाबीज व इतर बियाणे उत्पादकांमार्फत बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती उचित कार्यवाही करावी.	कृषि विभाग व पशुसंवर्धन विभाग
	३. कमी पाण्यात येणारी व एकापेक्षा जास्त वेळेस कापणी करण्यायोग्य चारापिकांची लागवड करण्यास प्रोत्साहन .मार्गदर्शन करणे /	पशुसंवर्धन विभाग आणि कृषी विभाग
	४. गाळपेरा क्षेत्र प्राधान्याने चारा लागवडीकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकरी/पशुपालकांना उपलब्ध करुन द्यावे.	जलसंपदा विभाग , जिल्हाधिकारी
	५. व्हीबी-जी राम जी योजना तसेच इतर योजनांशी समन्वय साधुन गायरानपडिक जमिनीमध्ये चारापिक लागव/नापिक/कुरण/ डीखाली आणण्यात यावी.	मृद व जल संधारण विभाग, वन विभाग, महसूल विभाग, ग्राम विकास विभाग
	६. कृषि विभागाच्या अखत्यारीतील कृषि विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्र व कृषि महामंडळाकडील जमिनीवर मका, न्युट्रीफिड, शुगरग्रेज, ज्वारी, बाजरी यासारख्या चारा पिकांची लागवड प्राधान्याने करण्यात यावी.	कृषि विभाग
	७. पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठ तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी महामंडळ आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या प्रक्षेत्रावर चारा लागवड करण्यात यावी	पशुसंवर्धन विभाग
	८. वन विभागाने वन जमिनीत उपलब्ध असलेला चारा गवताची /त्वरीत कापणी करणे, साठवणे व आवश्यकतेनुसार पशुपालकांना उपलब्ध करुन देण्यात यावी. या करिता शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांची मदत घेण्यात यावी.	वन विभाग
	९. वन विभागाकडे उपलब्ध असलेल्या जमिनी जिथे सिंचन व्यवस्था असेल अशा जमिनीवर चारा उत्पादनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात	वन विभाग
	१०. राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेंचे प्रभावी अंमलबजावणी .	महसूल विभाग

	११. जिल्हयातील चारा उपलब्धतेची स्थिती विचारात घेवून FPO, FPC आणि स्वंयसेवी संस्था यांच्यामार्फत चारा बँक स्थापन करण्यात याव्यात	जिल्हाधिकारी व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन
	१२. चारा कापणी/गठ्ठे बांधणे यासाठी कृषि विभागाकडील Custom Hiring Center मधील यंत्र सामुग्री तसेच पशुसंवर्धन विभागाकडील यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देणे.	कृषि विभाग व पशुसंवर्धन विभाग
	१३. दुष्काळस्थिती विचारात घेऊन सुका चारा प्रती किलो कमाल रु. १२/- (वाहतुक खर्च वगळून) व मुरघास प्रती किलो कमाल रु. ८/-(वाहतुक खर्च वगळून) अशी आधारभूत किंमत निश्चित करणे	पशुसंवर्धन विभाग
२	**आंतरजिल्हा चारा उपलब्धता व वाहतूक :** जिल्ह्यातील पशुधनास आवश्यक असणारा चारा जिल्ह्यातच उपलब्ध होत नसल्यास नजीकच्या जिल्ह्यातून चारा उपलब्ध होण्यासाठी विभागीय आयुक्त व सहआयुक्त पशुसंवर्धन /आयुक्त पशुसंवर्धन तसेच संबंधीत जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधून गरज भागविण्याची कार्यवाही करावी.	विभागीय आयुक्त व सहआयुक्त पशुसंवर्धन
३	**चारा साक्षरता अभियान -** पशुसंवर्धन विभागाने चारा साक्षरता अभियान व्यापक स्वरूपात राबविण्यात यावे. सदर अभियान केवळ जनजागृतीपुरते मर्यादित न ठेवता प्रात्यक्षिके, पशुपालक प्रशिक्षण, उपलब्ध चाऱ्याचे जतन व प्रक्रिया, चारा उत्पादन आणि स्थानिक पातळीवरील कृतीवर आधारित असावे. यामध्ये, १) उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन जसे की वेळेत कापणे व योग्यरीत्या साठवणूक करणे, मुरघास तयार करणे २) मूल्यवर्धनासाठी युरिया प्रक्रिया, एन्झाईम ट्रीटमेंट, ओझोन ट्रीटमेंट इ. बाबत मार्गदर्शन करावे. ३) भाताच्या पेंढयाची कुट्टी करुन युरिया प्रक्रिया करणे व शेत पिकाचे अवशेषांवर एन्झाइम प्रक्रिया/ ओझोन ट्रिटमेंट करणेबाबत पशुपालकांना प्रशिक्षित करावे.	पशुसंवर्धन विभाग, कृषि विज्ञान केंद्रे, कृषि विद्यापीठे व पशुवैद्यकीय
४	१) **हायड्रोफोनिक व अझोला यासारख्या पर्यायी स्रोताव्दारे मोहिमस्वरुपात चारा उत्पादन कार्यक्रम राबविणे:** हायड्रोफोनिक व अझोला उत्पादन पध्दतीमध्ये कमी पाणी व जागा आणि कमी कालावधीत सकस चारा उपलब्ध होत असल्याने हायड्रोफोनिक, अझोला **व** बिनकाटेरी निवडूंग लागवड पध्दतीची माहिती पशुपालकांना व्हावी यासाठी मोहिम स्वरुपात (Mission Mode) पशुपालकांना प्रात्येक्षिकाव्दारे मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच सर्व पशुवैद्यक	पशुसंवर्धन विभाग, कृषि विज्ञान केंद्रे, कृषि विद्यापीठे व पशुवैद्यकीय विद्यापीठ

	दवाखान्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हायड्रोफोनिक व अझोला पध्दतीने चारा उत्पादन करण्यात यावा.	
५	**कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधीचा विनियोग:-** हायड्रोफोनिक व अझोला पध्दतीने चारा उत्पादन, वैरण बियाणे, चारा कापणी व गठ्ठेबांधणी यंत्रणा, मुरघास निर्मिती व साठवणीसाठी मुरघास बॅग, चारा डेपो, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, छावण्यांतील स्वच्छता, CCTV यासारख्या सुविधांसाठी कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) मधून निधी उपलब्ध करुन घ्यावा	संबंधित जिल्हाधिकारी
६	**चाऱ्याच्या बिगर-पशुखाद्य वापरास व परराज्यात पाठवण्यास बंदी** : चारा पशुखाद्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी (उदा. पॅकिंग, बायोफ्युएल, वीजनिर्मिती) वापरण्यास तात्काळ प्रतिबंध करणे. तसेच दुष्काळी परिस्थितीत राज्यातील चारा सीमावर्ती भागातून शेजारच्या राज्यांमध्ये जाण्यास कायदेशीर मनाई (प्रतिबंध) सर्व जिल्हाधिका-यांनी करावी.	संबंधित जिल्हाधिकारी
७	**चारा छावणी:** १) शासन निर्णय दि. ०६.०४.२०२६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या "जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समिती" चे अध्यक्ष संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहे त्याऐवजी संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री यांचा अध्यक्ष म्हणून समावेश करावा. तसेच सदर समिती दुष्काळ व्यवस्थापनाऐवजी "जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन संनियंत्रण व आढावा समिती" असे नामकरण करण्यात यावे. २) प्रत्येक जिल्हयात संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समिती" गठीत करण्यात यावी. सदर समितीची संरचना व कार्यकक्षा प्रकरण ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.	मदत व पुनर्वसन विभाग
	३) महसूल मंडळातील प्रभावीत पशुधन संख्या, उपलब्ध चाऱ्याचे दिवस, पाण्याची उपलब्धता विचारात घेवुन एका महसूल मंडळामध्ये एक चारा छावणी सुरु करण्याबाबत परिस्थितीनुरुप निर्णय घ्यावा.	मदत व पुनर्वसन आणि संबंधित जिल्हाधिकारी
	४) महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दि. २५/०१/२०१९ व त्याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ मधील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावणी योजना राबविण्यात आली होती. सदर योजना राबवितांना आढळून आलेल्या त्रृटी/ गैरप्रकार विचारात घेवून चारा छावणी उभारण्याबाबत विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा कराव्यात.	मदत व पुनर्वसन विभाग

	१) चारा छावणी योजनेची पारदर्शकपणे व सुलभरित्या अंमलबजावणी होण्यासाठी राज्यस्तरीय ऑनलाइन Chara Chawani Monitoring & Management System विकसित करावी. सदर प्रणालीद्वारे महसूल मंडळनिहाय मागणी,उपलब्धता, छावणी व्यवस्थापन, पशुपालक व पशुधन नोंद, दैनिक उपस्थिती, चारा प्राप्ती व वितरण, पाणी, पशुवैद्यकीय सेवा, खर्च, देयके, इ. बाबत सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. या प्रणालीद्वारे संकलीत होणारी सर्व माहितीची योग्य पध्दतीने विश्लेषण करण्याकरिता राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व मंडळ पातळीवर डॅशबोर्डसुविधा मदत व पुनर्वसन विभागाने विकसीत करुन घेण्यात यावी. २) प्रत्येक छावणीत बायोमेट्रिक/QR उपस्थिती, भारत पशुधन प्रणाली - NDLM वर नोंदणीकृत पशुधनाची नोंद पडताळणी, २४ तास कार्यरत CCTV प्रणाली बंधनकारक करावी.	मदत व पुनर्वसन विभाग
८	वैरण बियाणे किट्स, चाफ कटर, फिरते पाण्याचे टँकर आणि छावण्यांमधील डिजिटल पायाभूत सुविधा, चारा व्यवस्थापन करण्याच्या प्रयोजनार्थ साखर कारखाने, दूध उत्पादक सहकारी संस्था, सेवाभावी संस्था, गोशाळा, शेतकरी उत्पादक कंपनी/ संस्था, इत्यादींचा सक्रीय सहभाग स्थानिकस्तरावर प्राप्त करुन घेण्यात यावा.	संबंधित जिल्हाधिकारी
९	सुका चारा व मुरघास यांच्या किंमती अभ्यासगटाने शिफारशीत केल्या आहेत. सदर किंमतीच्या मर्यादेत चारा खरेदी करण्यात यावी. चाऱ्याची टिकावू क्षमता विचारात घेवून शक्यतो सुका चारा खरेदी करण्यास प्राधान्य देण्यात यावे.	मदत व पुनर्वसन विभाग व संबंधित जिल्हाधिकारी
१०	जिल्हानिहाय चारा ताळेबंद व साप्ताहिक अहवाल	पशुसंवर्धन विभाग
११	साखर कारखाना समवेत उसाचे वाढे, बगॅस, मळी आवश्यकतेनुसार उपलब्ध होण्याबाबत कार्यवाही करावी	जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक (सहकार)
१२	उसाचे वाढे (Sugarcane top) वाया जाऊ नये यासाठी मजुराद्वारे ऊसतोडणी करण्यात यावी.	जिल्हा उपनिबंधक (सहकार)
१३	चारा उत्पादनाकरीता सवलतीच्या दरात वीज उपलब्धता	ऊर्जा विभाग

परिशिष्ट “ब”

विभागनिहाय चेकलिस्ट

१. मदत व पुनर्वसन विभाग

- ❑ चारा छावणी सुरू करण्याबाबत परिस्थितीनुरुप निर्णय घेणे.
- ❑ २०१८-१९ मधील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावणी योजना राबविण्यात आली होती. सदर योजना राबवितांना आढळून आलेल्या त्रृटी/ गैरप्रकार विचारात घेवून चारा छावणी उभारण्याबाबत विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा/एकत्रित सर्वसमावेशक आदेश निर्गमित करणे.
- ❑ चारा छावणी योजनेची पारदर्शकपणे व सुलभरित्या अंमलबजावणी होण्यासाठी राज्यस्तरीय ऑनलाइन Chara Chawani Monitoring & Management System विकसित करणे.
- ❑ छावणीत बायोमेट्रिक/QR उपस्थिती, भारत पशुधन प्रणाली - NDLM वर नोंदणीकृत पशुधनाची नोंद पडताळणी, २४ तास कार्यरत CCTV प्रणाली बंधनकारक करणे.
- ❑ परराज्यातून चारा खरेदीची आवश्यकता असल्यास त्याबाबत कार्यवाही करणे.

२. वित्त व नियोजन विभाग

- ❑ जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन योजना राबविण्यासाठी किमान ५% इतक्या निधीची तरतूद करणे.

३. जिल्हाधिकारी

- ❑ जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चा-याचे संवर्धन व मुल्यवर्धन आणि पर्यायी स्रोत या बाबतच्या योजना राबविण्यास किमान ५% निधी पालकमंत्र्यांच्या मान्येतेने उपलब्ध करुन घेणे.
- ❑ “जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन संनियंत्रण व आढावा समिती” च्या मार्गदर्शनात कामकाज करणे.
- ❑ “जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समिती” चे कामकाज पार पाडणे, तसेच चारा छावणीचे सुयोग्य व पारदर्शकपणे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व संबंधित विभाग / यंत्रणांशी समन्वय व संनियंत्रण करणे.
- ❑ स्थानिक स्थिती विचारात घेऊन आवश्यकतेनुसार चारा छावणी सुरु करण्याबाबत परिस्थितीनुरुप मदत व पुनर्वसन विभागास शिफारस करणे.
- ❑ जिल्ह्यातील उपलब्ध चाऱ्याचे/ चारापिके लागवडीखालील क्षेत्राचे मॅपिंग व सर्व सहभागधारकांबरोबर समन्वयन
- ❑ मुरघास व सुका चारा उत्पादकांचे नेटवर्क नियोजन

❑ चाऱ्याचे पशुखाद्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी वापरण्यास प्रतिबंध घालणे.

❑ जिल्हयातील पशुधनास आवश्यक असणारा चारा जिल्ह्यातच उपलब्ध होत नसले नजीकच्या जिल्ह्यातून चारा उपलब्ध करुन घेणे.

❑ गाळपेरा क्षेत्र प्राधान्याने चारा लागवडीकरिता शेतकरी/पशुपालकांना उपलब्ध करुन देणे.

❑ कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधीचा विनियोग

❑ चाऱ्याच्या बिगर-पशुखाद्य वापरास व परराज्यात पाठवण्यास बंदी

❑ जिल्हयातील चारा उपलब्धतेची स्थिती विचारात घेवून FPO, FPC आणि स्वंयसेवी संस्था यांच्यामार्फत चारा बँक स्थापन करणे.

❑ छावण्यांमध्ये डिजीटल व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.

❑ चारा व्यवस्थापन करण्याच्या प्रयोजनार्थ साखर कारखाने, दूध उत्पादक सहकारी संस्था, सेवाभावी संस्था, गोशाळा, शेतकरी उत्पादक कंपनी/ संस्था, इत्यादींचा सक्रीय सहभाग

❑ साखर कारखाना समवेत उसाचे वाढे, बगॅस, मळी आवश्यकतेनुसार उपलब्ध होण्याबाबत कार्यवाही

❑ सुका चारा व मुरघास यांच्या किंमती अभ्यासगटाने शिफारशीत किंमतीच्या मर्यादेत चारा खरेदी करण्यात यावे, तसेच चाऱ्याची टिकावू क्षमता विचारात घेवून शक्यतो सुका चारा खरेदी करण्यास प्राधान्य

४. कृषि विभाग

❑ महाबीज व इतर बियाणे उत्पादकांमार्फत बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती उचित कार्यवाही

❑ कमी पाण्यात येणारी व एकापेक्षा जास्त वेळेस कापणी करण्यायोग्य चारापिकांची लागवड करण्यास प्रोत्साहन/ मार्गदर्शन

❑ कृषि विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्र व कृषि महामंडळाकडील जमिनीवर मका, न्युट्रीफिड, शुगरग्रेज, ज्वारी, बाजरी यासारख्या चारा पिकांची लागवड

❑ चारा कापणी/गठ्ठे बांधणे यासाठी विभागाकडील Custom Hiring Center मधील यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देणे.

❑ चारा साक्षरता अभियान राबविणे.

❑ हायड्रोफोनिक, अझोला व बिनकाटेरी निवडूंग लागवड यासारख्या पर्यायी स्त्रोताव्दारे चारा उत्पादन करण्याच्या पध्दतींचा कृषि विद्यापीठद्वारे मोहिमस्वरुपात कार्यक्रम राबविणे.

५. पशुसंवर्धन विभाग

❑ महाबीज व इतर बियाणे उत्पादकांमार्फत बियाणे उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती उचित कार्यवाही

❑ कमी पाण्यात येणारी व एकापेक्षा जास्त वेळेस कापणी करण्यायोग्य चारापिकांची लागवड करण्यास प्रोत्साहन/ मार्गदर्शन

❑ पशुविज्ञान विद्यापीठ तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी महामंडळ आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या प्रक्षेत्रावर चारा लागवड

❑ जिल्हयातील चारा उपलब्धतेची स्थिती विचारात घेवून FPO, FPC आणि स्वंयसेवी संस्था यांच्यामार्फत चारा बँक स्थापन करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याबरोबर समन्वय साधून कार्यवाही करणे.

❑ चारा कापणी/गठ्ठे बांधणे यासाठी विभागाकडील यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देणे.

❑ चारा साक्षरता अभियान राबविणे.

❑ हायड्रोफोनिक, अझोला व बिनकाटेरी निवडूंग लागवड यासारख्या पर्यायी स्त्रोताव्दारे चारा उत्पादन करण्याच्या पध्दतींचा मोहिमस्वरुपात कार्यक्रम राबविणे.

❑ जिल्हानिहाय चारा ताळेबंद व साप्ताहिक अहवाल

❑ चारा छावणीतील जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन

❑ चारा छावण्यांमधून पुरवल्या जाणाऱ्या चाऱ्याच्या आणि खाद्याच्या दर्जाची तपासणी

६. जलसंपदा विभाग

❑ प्राधान्याने चारा लागवडीकरिता गाळपेरा क्षेत्रातील जमिनीबाबतचा तपशिल शेतकरी/पशुपालकांना वाटप करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देणे.

❑ चारापिके घेण्यासाठी प्राधान्याने पाणी उपलब्ध करुन देणे.

७. मृद व जल संधारण विभाग

❑ व्हीबी-जी राम जी योजनेत चारा उत्पादनाशी संबंधित असलेल्या घटक योजनांची इतर विभागाशी समन्वय साधून अंमलबजावणी

८. वन विभाग

❑ व्हीबी-जी राम जी योजना तसेच इतर योजनांशी समन्वय साधुन गायरान /कुरण/नापिक/पडिक जमिनीमध्ये चारापिक लागवड

❑ वन जमिनीत उपलब्ध असलेला चारा / गवताची त्वरीत कापणी करणे, साठवणे व आवश्यकतेनुसार शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांची मदत घेऊन पशुपालकांना उपलब्ध करुन देणे.

❑ सिंचन व्यवस्था उपलब्ध असलेल्या जमिनी चारा उत्पादनासाठी उपलब्ध करुन देणे.

९. महसूल विभाग

- व्हीबी-जी राम जी योजना तसेच इतर योजनांशी समन्वय साधुन गायरान /कुरण/नापिक/पडिक जमिनीमध्ये चारापिक लागवड
- राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेंचे प्रभावी अंमलबजावणी

१०. ग्राम विकास विभाग

- व्हीबी-जी राम जी योजना तसेच इतर योजनांशी समन्वय साधुन गायरान /कुरण/नापिक/पडिक जमिनीमध्ये चारापिक लागवड करणे.

११. सहकार विभाग

- साखर कारखाना समवेत उसाचे वाढे, बगॅस, मळी आवश्यकतेनुसार उपलब्ध होण्याबाबत कार्यवाही
- उसाचे वाढे (Sugarcane top) वाया जाऊ नये यासाठी मजुराद्वारे ऊसतोडणी करण्याचे निर्देश देणे

१२. ऊर्जा विभाग

- चारा उत्पादनाकरीता सवलतीच्या दरात वीज उपलब्धता